PUNEMETROPOLIS

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ,पुणे – ४४

**Pune Metropditan Region development Authority, Pune**

Pimpri - ChinchwadNavanagar Development Authority, Near Akurdi Railway Station, Pune44

Email: ad.pmrda@gmail.com

AD/का.प/३.१६/प्र.क्र.४९/शाखा-२ दि.१७/०३/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

**विषय :-** कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेचे अनुषंगाने प्राधिकरणाच्या औंध व आकुर्डी येथील कार्यालयात नागरिकांना प्रवेश बंद करणेबाबत.

**संदर्भ :-** १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/०३/२०२०

२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम, २०२०

३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

४) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्र.एमआयएस-०९१९/प्र.क्र.२२६/विशा-४, मंत्रालय, मुंबई दि.१६/०३/२०२०

वरील संदर्भाचे अनुषंगाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्तरावर खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) प्रतिबंधात्मक योजनेचा भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या औंध व आकुर्डी येथील कार्यालयामध्ये / विविध परीमंडळ विभाग व क्षेत्रीय कार्यालयात येणा-या अभ्यागतांच्या / नागरिकांच्या गर्दीवर देखील नियंत्रण राखणे आवश्यक आहे. सबब, वर नमूद कार्यालयांमध्ये अभ्यागतांना / नागरिकांना /ठेकेदार व ठेकेदारांचे कर्मचारी यांना पुढील आदेशापर्यंत प्रवेश बंद करण्यात येत आहे.

२) काही अपवादात्मक परिस्थितीत अथवा कामाकाजाचे आवश्यकतेनुसार मुख्य कार्यालयात येणे आवश्यक असल्यास सुरक्षा विभागास खालीलप्रमाणे निर्देश देणेत येत आहेत.

३) ज्या विभागाशी संबंधित कामकाज असेल त्या विभागाचे संबंधित विभागप्रमुखांनी त्यांची स्वाक्षरी असलेली लेखी परवागनी/पास संबधित अभ्यागताचे नावासह दिल्यानंतरच विशेष बाब म्हणून प्रवेश घ्यावा.

४) प्रवेश घ्यावयाचे नागरिकांनी मास्क परिधान केलेला असणे आवश्यक आहे.

५) प्रवेश केल्यानंतर कार्यालयातील स्वच्छतागृहामध्ये जाऊन सॅनिटायझरचा वापर करावा अथवा साबनाने / हॅंड वॉशने स्वच्छ हात धुऊन नंतरच कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडे जाणेबाबत सुरक्षा कर्मचारी यांनी समक्ष सूचना दयाव्यात. तसेच कामकाज पूर्ण झालेनंतर लगेच कार्यालय सोडणेबाबत सूचना दयावात. नागरिक अथवा इतर व्यक्ती जास्त वेळ विभागात रेंगाळणार नाहीत याची दक्षता बोलविणा-या संबंधित अधिका-याने घ्यावयाची आहे.

Scanned with CamScanner

६) प्राधिकरण गेट पास शिवाय कार्यालयामध्ये आढळणा-या अथवा विभागप्रमुखांनी लेखी परवानगी दिलेल्या नागरीकांशिवाय इतरांना सुरक्षा विभागाने प्राधिकरण कार्यालयामध्ये प्रवेश देवू नये.

७) अभ्यांगत / नागरिक इ. यांनी प्रत्यक्ष कार्यालयात न येता आपले म्हणणे / तक्रार / सूचना ह्या लेखी स्वरूपात ई-मेलव्दारे सोबत जोडलेल्या यादीनुसार त्या - त्या विभागास पाठवावे.

सदरचे परिपत्रक नागरिकांना अधिक माहिती होणेच्या दृष्टीने प्राधिकरण कार्यालयाचे संकेतस्थळ (www.pmrda.gov.in) आणि नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणेत येत आहे.

तरी उपरोक्त आदेशाची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

(श्रीमती कविता व्दिवेदी)
अतिरिक्त आयुक्त तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

(मा. महानगर आयुक्त यांचे मान्यतेने)

**प्रत,** १. सर्व विभागप्रमुख.

२. सुरक्षा रक्षक, आकुर्डी व औंध कार्यालय, यांना माहितीसाठी व विहित कार्यवाहीसाठी .

Scanned with CamScanner

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## कार्यालयातील सर्व विभागांची नावे व इमेल

| अ.क्र. | विभागाचे नाव | इ-मेल | शेरा |
|---|---|---|---|
| १) | मा.आयुक्त कार्यालय | comm@pmrda.gov.in | |
| २) | प्रशासन विभाग | ad.pmrda@gmail.com | |
| ३) | अभियांत्रिकी विभाग क्र.१ | cepmrda@gmail.com | |
| ४) | अभियांत्रिकी विभाग क्र.२ | | |
| ५) | अभियांत्रिकी विभाग क्र.३ | ce.water@pmrda.gov.in | |
| ६) | विकास परवानगी विभाग | mpp.pmrda@gmail.com | |
| ७) | नियोजन विभाग | planning.dept@gmail.com | |
| ८) | जमिन व मालमत्ता विभाग | lnepmrda@gmail.com | |
| ९) | अनधिकृत बांधकाम निर्मुलन व निष्कासन विभाग म-१ | illegalconstructions.pmrda@gmail.com | |
| १०) | अनधिकृत बांधकाम निर्मुलन व निष्कासन विभाग म-२ | | |
| ११) | अग्निशमन विभाग | fireofficer.pmrda@gmail.com | |
| १२) | लेखा व वित्त विभाग | cafopmrda@gmail.com | |
| १३) | आकाशचिन्ह विभाग | skysign.pmrda@gmail.com | |
| १४) | लवाद विभाग | adtp.pmrda@gmail.com | |
| १५) | उत्तमत्ता केंद्र | bhavana.pmrda@gmail.com | |
| १६) | विधी विभाग | legaldept.pmrda@gmail.com | |

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयाचे संकेतस्थळ : www.pmrda.gov.in**

Scanned with CamScanner